महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

पुणे शहरातील ९० हजार वाहनांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून योग्यता प्रमाणपत्र घेतले नसल्याबाबत

(१) २९४१० (१८-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ट्रक, टँकर, ट्रेलर, बस, दुरिस्ट, टॅक्सी, ऑटो रिक्षा आदि प्रकारच्या ९० हजार वाहनांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वार्षिक तपासणी करुन घेऊन योग्यता प्रमाणपत्र घेतले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त वाहनांनी योग्यता प्रमाणपत्र घेतले नसल्याने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१७) :(१) अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले होते.

(२) व (३) योग्यता प्रमाणपत्राच्या वैध मुदतीनंतर प्रमाणपत्राचे नुतनीकरण न करता वाहन चालविल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाते. दि.०१ एप्रिल, २०१५ ते दि.३१ जानेवारी, २०१६ या कालावधीतील तपासणीमध्ये योग्यता नुतनीकरण न केलेल्या ५,१४६ वाहनांवर कारवाई करुन धारकांकडून ८६,२७ लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच एप्रिल, २०१५ ते जानेवारी, २०१६ अखेर ५९, १३५ योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्यात आले आहे व २३५९० वाहन मालकांना नोटीसीद्वारे सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मोरा कोळीवाडा येथील मच्छिमारांचे जेएनपीटी बंदरातील वाहतुकीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत

(२) ३१७०६ (१०-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटी बंदरातील वाहतुकीमुळे मोरा कोळीवाडा येथील मच्छिमारांचे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत तसेच जेएनपीटी बंदराच्या चौथ्या टर्मिनलचा प्रस्तावित विस्तार लक्षात घेऊन मोरा-कोळीवाडा येथील मच्छिमारांच्या नुकसान भरपाईचा नव्याने आढावा घेणेबाबत श्री.एकविरा देवी सामाजिक संस्था, ता.उरण, जि.रायगड यांनी दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२४-०७-२०१७) :(१) होय.

(२) या निवेदनातील अ.क्र.१ ते ५ च्या मागण्या न्याय प्रविष्ठ आहेत. तसेच अ.क्र. ६ बाबत या ठिकाणी आधुनिक बंदर बांधण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध नाही. अ.क्र. ७ बाबत रा.स.वि.नि. अंतर्गत २९ नौकांना रु.२.७९ कोटी अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पर्ससिनेट मच्छीमार व हायस्पीड ट्रॉलर्सवर एमपीडीए कायदयांतर्गत कारवाई करण्याबाबत

(३) ४०५८४ (२०-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या समुद्रकिनाऱ्यावर घुसखोरी करणाऱ्या अन्य राज्यातील पर्ससिनेट मच्छीमार व हायस्पीड ट्रॉलर्सवर महाराष्ट्र धोकादायक कारवाया प्रतिबंधक (एमपीडीए) कायदयांतर्गत कारवाई करण्याची घोषणा शासनाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत या कायदयांतर्गत किती जणांवर आतापर्यंत कारवाई करण्यात आली आहे,

(३) महाराष्ट्र धोकादायक कारवाया प्रतिबंधक (एमपीडीए) कायदयांतर्गत कारवाई करण्याच्या निर्णय झाल्यानंतर घुसखोरीला प्रतिबंधक आळा बसला आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२८-०७-२०१७) :(१) सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात सभागृहात चर्चेसाठी आलेल्या विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ३४६०३ ला उत्तर देतेवेळी राज्य शासन अशा स्वरुपाच्या घटनांवर कारवाई करीत असताना एमपीडीए लावण्याबाबत केंद्र शासनास शिफारस करेल असे सभागृहास आश्वासित करण्यात आले होते.

(२), (३) व (४) परराज्यातील मच्छिमार राज्याच्या जलधीक्षेत्रात मासेमारी करताना पकडले गेल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ च्या प्र.क्र. ३ मधील कलम १५ (२) अनुसार जप्त केलेल्या बोटीवरील मालाचा लिलाव करण्यात येतो. एमपीडीएच्या अधिनियमातील तरतूदीनुसार, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचेल अशा विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी त्या व्यक्तिच्या प्रतिबंधात्मक स्थानबध्दतेची तरतूद आहे. एमपीडीए अधिनियमातील या तरतूदी विचारात घेता परराज्यातील मच्छिमारांवर या अधिनियमानुसार कारवाई करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

राज्यातील ट्रॅव्हल्स गाडयांच्या अपघातामध्ये झालेली वाढ

(४) ४१५९० (२८-०४-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये मागील काही वर्षात ट्रॅव्हल्स गाडयांचे अपघात होण्याचे प्रमाण वाढल्याने यामधून प्रवास करणारे प्रवासी असुरक्षित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ट्रॅव्हल्स गाडयांना परिवहन विभागाने सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही मार्गदर्शक तत्वे तयार केलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या गाडयांचे अपघात होऊन प्रवासी मुत्युमुखी पडला तरी कोणतीही नुकसान भरपाई दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन यासंदर्भात सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्वे तयार करणार आहेत काय,

(५) असल्यास, या गाडयांच्या अपघातामध्ये मुत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळणेबाबत तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्वे तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२६-०७-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम, १२८ व महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १८३ (अ) मध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाय योजना विहीत केलेल्या आहेत. सदर तरतुदींची पूर्तता केल्यानंतरच अखिल भारतीय पर्यटक बसेस व स्लीपर बसेसची नोंदणी केली जाते. तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १४६ नुसार वाहनाचा तृतीय

पक्षाचा विमा काढणे अनिवार्य आहे. त्यामुळे बसचा अपघात झाल्यास जखमीस वा मृताच्या वारसांना मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई देण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान धरण प्रकल्पातंर्गत लाभार्थ्यांना भूखंड वितरीत करण्यास विलंब होत असल्याबाबत

(५) ५४१७० (०७-०९-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान धरण प्रकल्पातंर्गत गेल्या ६ वर्षापासून श्री.राजाराम मारुती कडू यांना भूखंड वितरण करण्यास संबंधित खात्याचे अधिकारी वारंवार टाळाटाळ करत असल्याचे माहे जून २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच श्री.कडू व अनेक लाभार्थ्यांच्या नस्त्या संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक गहाळ करत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार लाभार्थ्यांना त्वरीत भूखंड वितरीत करण्याबाबत व भूखंड वितरण करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे उकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे वीज कोसळून झालेले नुकसान

(६) ५५०४६ (२२-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात झालेल्या वादळी पावसामुळे वीज कोसळून नऊ बक-या ठार तर तीन बक-या जखमी झाल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या नुकसानग्रस्त पशुपालक शेतक-यांला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१७) :(१), (२) व (३) दि.११ मे,२०१६ रोजी उकळी येथील ९ बकऱ्या वीज पडून मृत्यू पडल्या आहेत. सदरहू आपाद्ग्रस्त शेतकऱ्यांना या विभागाच्या दि.१३ मे,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार रु.२७,०००/- इतकी आर्थिक मदत अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जनावरांच्या अपघाती मृत्युची नुकसान भरपाई मिळणेबाबत

(७) ६०६३० (२२-०८-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नैसर्गिक आपत्ती, विजेचा झटका, सर्पदंश इत्यादी कारणामुळे राज्यात अनेक ठिकाणी गाई, म्हशी, बैल, शेळा मेंढ्या व इतर सर्व जनावरांचा मृत्यु होतो, परंतु याची नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाकडे अनेक अर्ज प्रलंबित असून अशा प्रकारची नुकसान भरपाई शासनाने दिलेली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासन विशिष्ट धोरण आखून निर्णय घेणार हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाबतीत शासकीय यंत्रणेकडून पंचनामा व इतर कामांसाठी विशिष्ट कर्मचारी वर्ग देखील नेमण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती पंचनामा व इतर कामांसाठी विशिष्ट कर्मचारी वर्ग नेमण्याबाबत तसेच नुकसान भरपाई देण्यासाठी विशिष्ट धोरण आखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१७) :(१) फक्त नैसर्गिक आपत्तीमध्येच मृत्यू होणाऱ्या जनावरांपोटी नुकसान भरपाई अनुज्ञेय आहे. विजेचा झटका, सर्पदंश या बाबी नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्यामुळे त्यांना मदत अनुज्ञेय ठरत नाही.
(२), (३), (४) व (५) नैसर्गिक आपत्ती अंतर्गत दुधाळ जनावरे, ओढकाम करणारी जनावरे किंवा माल वाहतूकीसाठी वापरण्यात येणारी जनावरे दगावल्यास झालेल्या नुकसानाकरीता आपद्ग्रस्तांना दिनांक १३ मे,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार तात्काळ मदत देण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दुष्काळग्रस्ताना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

(८) ६०६७८ (२९-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २८० हजार गावांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळाची तीव्रता असतानाही ७० टक्क्याहून अधिक गावांमध्ये नरेगा अंतर्गत रोहयोची कामे करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ २५ लाख कोकण नरेगा अंतर्गत काम देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुष्काळ जाहीर केला असतानाही दुष्काळग्रस्ताना रोजगार उपलब्ध न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-०७-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जवळपास ७०% ग्रामपंचायतीत योजनेची कामे घेण्यात येत असून जवळपास ३०% ग्रापंचायतीत कामाची मागणी न आल्याने योजनेची कामे होत नाहीत.

(३) हे खरे नाही.

प्रश्नात २५ लाख लोकांना असे वाचल्यास ही बाब अंशत: खरी आहे. वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये २१.२९ लक्ष २०१५-१६ मध्ये २३.९६ लक्ष व २०१४-१५ मध्ये २१.५६ लक्ष मजूरांनी नरेगा अंतर्गत कामे केली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मराठवाडा, विदर्भ व खानदेशातील पडलेल्या अवकाळी व गारपिट पावसामुळे झालेले नुकसान

(९) ६४२०१ (२२-०८-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा, विदर्भ व खानदेशातील पडलेल्या अवकाळी व गारपिटाचा पावसामुळे रब्बी पीके व फळबागांचे नुकसान झाले तसेच वीज पडून जवळपास ६ जणांचा बळी गेला व ५५ जनावरे दगावल्याने पंचनामे करुन आपदग्रस्तानां आर्थिक मदत देण्याची मागणी विविध सामाजिक, कृषी संघटनांचे पदाधिकारी, जागरूक नागरिक, सामाजिक कार्यकर्त्यांनी राज्याचे मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (महसूल व पुनर्वसन), मा.राज्यमंत्री (महसुल व पुनवर्सन), संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, यांच्याकडे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भातील सुधारीत नियमांनुसार मृतांच्या कुटुंबियांना रू ४ लाखांची मदत देण्याचे शासनातर्फे निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ व २ प्रकरणी चौकशीकरुन मृतांच्या कुटुंबियांना रू ४ लाखांची मदत तसेच आपदग्रस्तानां आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१७) :(१) व (२) हे खरे आहे.
(३) दि.१३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मृतांच्या वारसांना रु.४.०० लक्ष इतकी आर्थिक मदत संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात आली आहे. तसेच शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानाबाबत आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना दि.२० सप्टेंबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मदत जाहीर करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळात कमी वेतनाअभावी नोकरी सोडणाऱ्या अधिकाऱ्यांची वाढत असलेली संख्या

(१०) ६५८६४ (१६-१२-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळात मिळणाऱ्या कमी वेतनाअभावी नोकरी सोडणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या वाढत असून व पद भरतीसाठी वारंवार प्रक्रिया राबवावी लागत असल्यामुळे नोकरी सोडून जावू नये म्हणून महामंडळातील अधिकाऱ्यांना तीन वर्षाच्या ऐवजी दोन वर्षाच्या कालावधीत वेतन श्रेणी वाढ देण्याचे माहे सप्टेंबर २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळातील चालक, वाहक व यांत्रिक कामगारानांही कमी वेतन मिळत असून त्यांचा वेतन श्रेणी वाढीचा कालावधीही कमी करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अधिकाऱ्यांप्रमाणेच कर्मचाऱ्यांची वेतन श्रेणी वाढीचा कालावधी कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :(१) होय.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळातील वर्ग ३ व वर्ग-४ मधील कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी दि.०१.०४.२०१२ पासून पाच वर्षावरुन तीन वर्षाचा केला होता. दि.०१.०४.२०१७ पासून सदर कालावधी ३ वर्षावरुन १ वर्ष इतका करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा तोटा दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत

(११) ६५९९६ (१२-१२-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा तोटा दिवसेंदिवस वाढत असून सन २०१४-१५ मध्ये १,६८० कोटी रुपये असलेला तोटा सन २०१५-१६ मध्ये १,९८० कोटी रुपयांच्यावर गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या एसटीला दैनदिन खर्चासाठी १८ कोटी रुपये लागतात आणि दोन वर्षापूर्वी हाच आकडा १२ ते १४ कोटी रुपये एवढा होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदरहू महामंडळास होत असलेला तोटा कमी करून महामंडळास आर्थिक फायदा होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :(१) व (२) सन २०१४-१५ अखेरीस महामंडळाला रु.१६८५.३४ कोटी इतका संचित तोटा होता. हा संचित तोटा सन २०१५-१६ च्या अलेखापरिक्षीत वार्षिक लेख्यानुसार रु.१९२७.७७ कोटी झाला आहे.

सन २०१५-१६ च्या अलेखापरिक्षीत वार्षिक लेख्यानुसार एस.टी.ला दैनंदिन खर्चासाठी रु.२०.४८ कोटी खर्च लागतो. सन २०१३-१४ च्या वार्षिक लेख्यानुसार एस.टी.ला दैनंदिन खर्चासाठी रु.२०.०९ कोटी इतका खर्च येत होता.

(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाचा तोटा कमी करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

१) राज्य परिवहन प्रवासी व उत्पन्नात वाढ होण्याकरीता राज्य परिवहन महामंडळामध्ये दि.०१.०१.२०१७ ते दि.३१.०३.२०१७ पर्यंत प्रवासी वाढवा विशेष अभियान राबविण्यास सुरुवात केली आहे.

२) भारमान पातळीत किमान २ अंकानी वाढ करुन ७१.६० अंकाचे उद्दीष्ट ठेवले आहे.

३) राज्य भरात सद्या अस्तित्वात असलेल्या ४१ बस स्थानकांचे कायापालट तसेच पुनर्बांधणी करण्याकरीता ३० आर्किटेक्ट यांची नेमणूक करण्यात आली आहे.

४) प्रवाशांना राज्य परिवहन बसेसच्या वेळापत्रकाची माहिती मिळण्याकरीता मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहे.

५) पेटीएम व अन्य तीन संस्थांना ई-व्हॉलेट व पेमेंट गेटवे बाबत नियुक्ती करण्यात आली आहे.

६) दिवाळी हंगाम व इतर सनांच्या कालावधीत लवचिक भाडे आकारणी करुन सन २०१६ च्या दिवाळी हंगामात रु.२८ कोटीचे अतिरिक्त उत्पन्न मिळविले आहे.

७) विना वाहक व शटल फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली असून, प्रवाशांना मुबलक सेवा पुरविणे शक्य झाले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक शेतकरी ठिबक सिंचन, शेडनेट, कांदाचाळीच्या अनुदानापासून वंचित राहिलेबाबत

(१२) ६६५०१ (१६-१२-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील कृषि विभागाच्या ठिबक सिंचन, शेडनेट, कांदाचाळ योजनेच्या अनुदानापासून शेतकरी दोन वर्षापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीअंती सदर योजनेसाठी निधी उभारुन शेतकऱ्यांना तीनही योजनांचे अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (२६-०७-२०१७) :(१) अकोले तालुक्यातील (जि.अहमदनगर) ठिबक सिंचन योजनेचे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील पूर्वसंमती दिलेले अनुक्रमे रु.२४.५३ लक्ष व रु.२.०५ लक्ष असे एकूण रु.२६.०५८ लक्ष एवढ्या रकमेचे अनुदान प्रलंबित होते.

शेडनेट व पॉली हाऊस या घटकांचे पूर्वसंमती दिलेल्या लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित नाही.
(२) सुक्ष्म सिंचनाचे प्रलंबित अनुदान देण्यासाठी आवश्यक निधी सन २०१६-१७ या वर्षात उपलब्ध करुन देण्यात आला आहे. रु.२२.२६ लक्ष एवढी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली असून उर्वरीत अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामीण भाग शहरी भागाला जोडणाऱ्या एस.टी. महामंडळाने मोठ्याप्रमाणात सुसूत्रीकरणाचे धोरण अवलंबून अनेक लांब पल्लाच्या फेऱ्या बंद केल्याबाबत

(१३) ६८११९ (१६-१२-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भाग शहरी भागाला जोडणाऱ्या एस.टी. महामंडळाने मोठ्याप्रमाणात सुसूत्रीकरणाचे धोरण अवलंबिले आहे यातून अनेक लांब पल्लाच्या फेऱ्यां बंद केल्या असून

त्याचा परिणाम प्रवाशांवर होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आगारांचा आढावा घेतला जात असून ३० किमी च्या आत असणाऱ्या एकापेक्षा जास्त आगारापैकी एक आगार बंद केले जाणार आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न १ व २ नुसार प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता महामंडळाचे सदर निर्णय मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :(१), (२) व (३) राज्य परिवहन मुंबई प्रदेशातील सर्व विभाग नियंत्रक, विभागीय वाहतूक अधिकारी व सहाय्यक वाहतूक अधिक्षक यांची राज्य परिवहन बसेसच्या सुसूत्रीकरणाची बैठक होऊन ज्या फे-यांना थेट प्रवासी संख्या कमी आहे अशा लांब व मध्यम लांब पल्ल्यांच्या फेऱ्यांचा पुरेसा थेट प्रवासी प्रतिसाद उपलब्ध नाही अशा लांब व मध्यम लांब फे-या स्थगीत करण्यात आल्या आहेत. स्थानिक मार्गावरील प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून गट निहाय (पॉकेट निहाय) फेऱ्या सुरु ठेवण्यात आलेल्या आहेत. यामुळे प्रवाशांची गैरसोय झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात एसटी प्रवासात अपघात टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत

(१४) ६८१४३ (१६-१२-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एसटी प्रवासात जुलै, २०१६ च्या एका महिन्यात २५६ एसटी अपघात होऊन २४ जणांचा बळी गेल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या काही महिन्यात एसटीचा प्रवास असुरक्षित होत असल्याने राज्य शासनाने याबाबत दखल घेऊन सदरील अपघात टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :(१) व (२) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसद्‌वारा २५६ अपघात होऊन जुलै, २०१६ या एका महिन्यात ५६ व्यक्ती मयत झालेल्या आहेत.

जानेवारी, २०१७ मध्ये विनाअपघात सुरक्षितता मोहिम राबविण्यात आली असून, अपघात रोखण्यासाठी व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून राज्य परिवहन महामंडळातर्फे राज्य परिवहन मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे येथे अपघात प्रवण चालकांना ७ दिवसांचे निवासी प्रशिक्षण व मे.वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल्स असोशिएशन तर्फे एक दिवसाचे

सिम्युलेटर प्रशिक्षण देण्यात येते. तसेच प्रजापिता ब्रम्हकुमारी विश्वविद्यालयाच्या प्रशिक्षकांमार्फत आगार पातळीवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करुन चालकांना त्यांचेकडून मार्गदर्शन करुन प्रबोधन केले जाते.

राज्य परिवहन चालकांसाठी प्रत्येक विभागामध्ये चालकांच्या सकारात्मक मानसिकतेकरिता तज्ञ समुपदेशकाची नियुक्ती करण्यात येऊन त्यांचेद्वारे समुपदेशन केले जात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमारांनी राज्याबाहेरील जलधीक्षेत्रात मासेमारीसाठी केलेल्या मागणीबाबत

(१५) ७३८२८ (१३-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमारांनी राज्याबाहेरील जलधीक्षेत्रात मासेमारी करण्याची परवानगी सहाय्यक मत्स्यविभाग यांचेकडे माहे जानेवारी २०१७ च्या पहिल्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आत्तापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) राज्याला या राज्याच्या जलधी क्षेत्राबाहेर विशाल आर्थिक क्षेत्रात मासेमारी करण्यासाठी परवानगी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्रातील मच्छिमारांना इतर राज्याप्रमाणे परसीन नेटद्वारे मासेमारी करण्याची परवानगी देणेबाबत

(१६) ७४१४४ (२०-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संदीप नाईक

(ऐरोली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केरळ व कर्नाटक राज्यातील मच्छिमार परसीन नेटद्वारे मासेमारी केली जात असून मात्र महाराष्ट्र शासनाने सदर मच्छिमारीवर बंधन घातले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील मच्छिमारांना परसीन नेटद्वारे मच्छिमारी करण्यास परवानगी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२८-०७-२०१७) :(१) हे खरे नाही. महाराष्ट्र राज्याप्रमाणे केरळ व कर्नाटक राज्यामध्ये देखील त्या राज्याच्या जलधीक्षेत्रामध्ये पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करण्यास निर्बंध घालण्यात आलेली आहे.

(२) व (३) पारंपारिक मच्छिमार व पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणारे मच्छिमार यांच्यात होणारा संघर्ष टाळण्यासाठी शासनाने पर्ससीन मासेमारी व तिचा पर्यावरणावर होणारा परिणाम याचा अभ्यास करण्यासाठी डॉ. कै. व्ही. एस. सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १०.५.२०१२ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार दिनांक ५.२.२०१६ च्या शासन अधिसूचनेद्वारे राज्याच्या जलधीक्षेत्रात काही निर्बंधीत क्षेत्राबाहेर माहे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीमध्ये आणि इतर वेळेस राज्याच्या जलधीक्षेत्राबाहेर काही अटी व शर्तीच्या अधिन राहून पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करण्यास दिनांक ५.७.२०१६ च्या शासन पत्राद्वारे नियमन करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहर व उपनगरात रिक्षा, टॅक्सी व खाजगी बस व वाहनातून अवैध प्रवाशी वाहतुक होत असल्याबाबत

(१७) ७४४२९ (१७-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात रिक्षा, टॅक्सी व खाजगी बस व वाहनातून अवैध प्रवाशी वाहातुक करणा-या किती जणांवर परिवहन विभागाने माहे नोव्हेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत कारवाई केली आहे,

(२) असल्यास, अवैध वाहतुक करणा-या वाहन चालकांचे परवाने रद्द करण्यात आली आहेत काय,

(३) असल्यास, कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२६-०७-२०१७) :(१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व, मध्य व पश्चिम) व उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बोरिवली यांनी अवैध प्रवासी वाहतूक करणा-या २१३ दोषी वाहनांवर कारवाई केलेली आहे.
(२) व (३) अवैध प्रवासी वाहतूक करणा-या ५१ वाहनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून १३७ वाहन चालकांचे अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आलेल्या आहेत. तसेच २५ वाहनांची नोंदणी निलंबीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औसा (जि.लातूर) तालुक्यातील नुकसानग्रस्त तुर उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

(१८) ७४६२२ (१९-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील ६०० शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत वाटप करण्यात आलेल्या तुरीच्या बियाणांची उगवण झाली मात्र शेंगा न लागल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुषंगाने संबंधित बियाणे प्रमाणीत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व नुकसानग्रस्त तुर उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (२८-०७-२०१७) :(१) याबाबत २४१ शेतकऱ्यांची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) व (३) तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय कृषि अधिकारी, लातुर यांच्या अध्यक्षतेखाली तालुका कृषि अधिकारी, औसा, ICRISAT चे शास्त्रज्ञ व मांजरा कृषि विज्ञान केंद्र, लातूर यांची समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या शास्त्रज्ञांनी संकरीत तुरीच्या प्लॉटची पाहणी केली असता तूर पिकामध्ये मूळगुणधर्म (True to type) आढळून आला.

तसेच तूर पिकामध्ये शेंगा लागणे व पिक पक्वतेच्या कालावधीमधील विलंब हा माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे व नंतर शेतकऱ्यांनी दिलेल्या सिंचनामुळे झाला असल्याचा अंदाज दर्शविण्यात आला आहे. यास्तव बियाणे प्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सदर अहवालात कोणती कार्यवाही केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे तोटयात चालणारी शहर बस वाहतूक सेवा देण्यास राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दिलेला नकार

(१९) ७४९२२ (१७-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे तोटयात चालणारी शहर बस वाहतूक सेवा देण्यास राज्य मार्ग परिवहन महामंडळाने असमर्थतता व्यक्त केली असून महापालिकेने गेल्या पाच वर्षात महामंडळाला झालेल्या सुमारे १०८ कोटी रुपयांच्या तोटयाची भरपाई द्यावी अन्यथा येत्या दिनांक १ फेबुवारी, २०१७ रोजी पासून शहर बससेवा बंद करण्याची सूचना दिली असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून महामंडळाला त्यांची तोट्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :(१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळामार्फत नाशिक महानगरपालिका क्षेत्रात शहर बस सेवा चालविली जात असून, उक्त सेवेमुळे मार्च, २०१६ अखेर महामंडळास रु.१०८ कोटी इतका तोटा झाला आहे. महामंडळाच्या आर्थिक स्थितीचा विचार करता, उक्त शहर बस वाहतुक चालविणे हितावह नसल्याने, राज्य परिवहन महामंडळाने दिनांक ०३.०१.२०१७ च्या पत्रान्वये नाशिक शहर बस वाहतुकीमुळे होणाऱ्या तोटयाची भरपाई करावी अन्यथा शहर बस सेवा दिनांक ०१.०२.२०१७ पासून बंद करण्यात येईल असे नाशिक महानगर पालिकेस कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उरण (जि.रायगड) तालुक्यातील प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

(२०) ७४९५९ (१३-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यात मागील अनेक वर्षात शासकीय, निमशासकीय व खाजगी वेगवेगळया प्रकारच्या अनेक उद्योग व प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या १०० टक्के शेतजमिनी संपादित होवूनही हजारो स्थानिक प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांना अद्यापही नोकरीत सामावून न घेतल्याचे माहे जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक प्रकल्पग्रस्तांना आपल्या हक्काचे रोजगार उपलब्ध असताना सुद्धा अनेक उद्योगात बाहेरील कामगारांची भरती करून स्थानिक प्रकल्पग्रस्तांना डावलले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांना नोकरीतून डावलले जात असल्यामुळे वारंवार मोर्चा व आंदोलनामुळे उक्त परिसरात कायद्या व सुव्यवस्थेला धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

जेएनपीटी प्रकल्पाचे प्रकल्पग्रस्त अंदाजे ३५२४ असून आजतगायत ९०७ प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्ष नोकरीत सामावून घेतलेले आहे. BOT तत्वावर मे. गेटवे टर्मिनल ऑफ इंडीया मध्ये १८१ व मे.न्हावा शेवा इंब्रनॅशनल कंटेनर टर्मिनल मध्ये ३८८ प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्यात आलेले आहे.

(२) जेएनपीटी प्रकल्पाचे अहवालानुसार प्रकल्पस्तरावर आवश्यक तांत्रिक व व्यावसायीक अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवार भरती केले जातात. असे उमेदवार स्थानिक स्तरावर प्राप्त होत नाहीत. जेएनपीटीकडून प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेणे शक्य नसल्याने प्रकल्पग्रस्त सहकारी सोसायटीच्या माध्यमातून कंत्राटी कामगार म्हणून अंदाजे ८४० प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे, प्रकल्पग्रस्त स्थानिकांना व्यवसायाकरीता १२६ गाळ्यांचे वाटप करण्यात आले असून ४५ गाळ्यांचे वाटपाची प्रक्रीया चालू आहे.

(३) दिनांक ०५.०१.२०१७ रोजी शेतकरी कामगार पक्ष यांच्या नेतृत्वाखाली जवाहरलाल नेहरु पोर्ट व डी. पी. डी. धोरणा विरोधात नोकरी व व्यवसाय बचाव अंदोलन करण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-एमईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २१/०१/१९८० नुसार प्रकल्पग्रस्त कुटुंबातील, प्रकल्पग्रस्तावर अवलंबून असणाऱ्या एका व्यक्तीस नोकरीविषयक प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात येतो. प्रकल्पग्रस्त दाखला धारकास उपरोक्त शासन निर्णय व महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील तरतूदीनुसार “क” व “ड” वर्ग नोकऱ्यांत प्राथम्य देण्यात येते. तसेच प्रकल्पग्रस्तांच्या नेमणुका त्यांची सेवाप्रवेश अर्हता तपासून व सेवाप्रवेश नियमानुसार जाहिरात देऊन स्पर्धा परिक्षेव्दारे करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने आदेश दिले होते. त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २७/१०/२००९ रोजी आदेश निर्गमित केले असून त्यानुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूकीची कार्यवाही केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील करंजा रेवस खाडीकिनाऱ्यावरील मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

(२१) ७४९८२ (१७-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजा रेवस (जि.रायगड) येथील खाडीकिनारी दिवसेंदिवस नवनविन प्रकल्प येत असल्याने खाडी किनारी होत असलेले मातीचे भराव आणि वाढत्या प्रदुषणामुळे मासेमारीवर उदरनिर्वाह करणा-या शेकडो पारंपारिक कुटुंबावर मासळीच्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या नुकसानग्रस्त मच्छिमारांना तात्काळ मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०७-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

खाडी किनाऱ्यावरील नवीन प्रकल्प व प्रदुषणामुळे तेथील पारंपारिक मच्छिमारांच्या मत्स्योत्पादनावर परिणाम झाला आहे.

(२) राज्यातील सागरी किनारी क्षेत्रातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्हयातील किनारपट्टीवरील प्रदुषणामुळे मत्स्योत्पादनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी दिनांक २४ फेब्रवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आलेली आहे. समितीचा अहवाल प्रलंबित आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील राज्य परिवहनाच्या ८ आगारांमध्ये राहण्याची व स्वच्छता गृहाची सोय नसल्यामुळे एसटी चालक व वाहकाची गैरसोय होत असल्याबाबत

(२२) ७५०६९ (१२-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील राज्य परिवहनाच्या ८ आगारांमध्ये राहण्याची व स्वच्छता गृहाची सोय नसल्यामुळे रात्रीच्या वेळी मुक्कामाला असणाऱ्या वाहन चालक व वाहकांची मोठयाप्रमाणात गैरसोय होत असल्याची माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील जनतेला प्रवासाची गैरसोय होऊ नये म्हणून रात्रीच्या वेळी मुक्कामाला असणाऱ्या वाहन चालक व वाहकाला बसमध्ये झोपावे लागत असल्याने मच्छरांच्या त्रासामुळे त्यांच्या दैनंदिन कामावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वच्छता गृह नसल्यामुळे व असलेली स्वच्छता गृहांच्या बिकट अवस्थांमुळे वाहन चालक व वाहकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून जनतेला उत्तम परिवहन सेवा देण्याच्या दृष्टीने वाहन चालक व वाहक यांची गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) राज्य परिवहन महामंडळाच्या रायगड विभागातील ८ आगारांमध्ये व आगारांतर्गत १९ बसस्थानकांवर रात्र मुक्कामी चालक/वाहकांसाठी विश्रांतीगृहाची व्यवस्था करण्यात येवून, त्याची दैनंदिन स्वच्छता व देखरेख महामंडळामार्फत करण्यात येत आहे. तसेच, खेडेगावात रात्र मुक्कामाला असणाऱ्या चालक वाहकांना राज्य परिवहन वाहनांमध्ये झोपण्याची तरतूद केलेली आहे. खेडेगावात मुक्कामी जाणाऱ्या चालक/वाहकांना झोपण्याची व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन देणेबाबत ७३ गावांतील सरपंचांना महामंडळामार्फत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बसस्थानकांवर सोईसुविधा पुरवून प्रवाश्यांच्या संख्येत वाढ करण्यासाठी उपयोजना करण्याबाबत

(२३) ७५११८ (१५-०३-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बसस्थानकांतील गैरसोई आणि एसटी कर्मचा-यांच्या गैरवर्तणूकीबाबतच्या तक्रारी गेल्या दोन वर्षापासून वाढल्या असल्याने एसटीचे ११ कोटी प्रवासी कमी झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी महामंडळाने १ जानेवारी पासून 'प्रवासी वाढवा' मोहिम हाती घेतली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती प्रवाशांची संख्या वाढली आहे,
(४) असल्यास, राज्यातील बसस्थानकात सोई-सुविधाही देण्याबाबत शासनाने केाणती कायर्वाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१७) :(१) बसस्थानकावरील गैरसोयी व कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तुणूकीबाबत प्रवाशांमार्फत राज्य परिवहन महामंडळास तक्रारी प्राप्त होतात. सदर तक्रारींची दखल घेऊन संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार खाते निहाय

कारवाई केली जाते. अवैध प्रवासी वाहतुकीमुळे व इतर कारणांमुळे सुध्दा प्रवासी संख्येत घट होऊन डिसेंबर, २०१६ अखेर गतवर्षीच्या तुलनेत प्रवासी संख्येत ५.१९ कोटीने घट झाली आहे.

(२) होय.

(३) दि.०१ जानेवारी २०१७ ते दि.३१ मार्च २०१७ या "प्रवासी वाढवा" मोहिमेच्या कालावधीत प्रतिदिन ०.१७ लाखाने प्रवासी वाढलेले आहेत.

(४) राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांवर प्रवाशांच्या सोयीसाठी संगणकीय ध्वनीक्षेपण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. संगणकीय आरक्षण सुविधा, स्वाईप मशीन सुविधा, पुरविण्यात आली आहे. शासनाच्या निधीतून काही ठिकाणी बसस्थानकाची पुनर्बांधणी/ आधुनिकीकरण/दर्जावाढ इ. कामे हाती घेण्यात आलेली आहेत. त्यामध्ये प्रवाशांसाठी प्रतिक्षालय, संगणकीय आरक्षण व्यवस्था, हिरकणी कक्ष, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृहाची सोय, ग्रॅनाईट बेंचेस इ. व्यवस्था करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्ह्यातील पशुचिकीत्सालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(२४) ७५३६९ (१३-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखांदूर (जि. भंडारा) येथील पशुवैद्यकीय चिकीत्सालयाचे उद्घाटन करुन वर्ष लोटले असूनही पशूधनावर उपचार करण्यासाठी चिकीत्सालयात अद्याप पशूवैद्यकीय अधिकारी, पर्यवेक्षक व पट्टीबंधकांची नियुक्तीच करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपुर्ण जिल्ह्यात जिल्हा परिषद पशूसंवर्धन विभागातंर्गत ५३ व जिल्हा पशूसंवर्धन उपायुक्त अंतर्गत ३२ पशूचिकीत्सालय असून ८५ पैकी ६१ अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनावरांच्या आरोग्याच्या प्रश्न लक्षात घेता लाखांदूर व जिल्ह्यातील पशुचिकीत्सालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (१०-०७-२०१७) :(१) होय.

तालूका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, लाखांदुर जि.भंडारा येथील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन हे पद भरले असून पशुधन विकास अधिकारी व्रणोपचारक परिचर ही पदे रिक्त आहेत. तथापि रिक्त असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या दवाखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आला असून पशुपालकांना नियमितपणे सेवा पूरविण्यात येत आहे.

(२) जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत १५८ पदे मंजूर असून १४० पदे भरलेली आहेत व १८ पदे रिक्त आहेत.

तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त अंतर्गत ९८ पदे मंजूर असून ६४ पदे भरलेली आहेत व ३४ पदे रिक्त आहेत. अशाप्रकारे एकूण अधिकारी व कर्मचारी ५२ पदे रिक्त आहेत.

(३) पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गाची १०० रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.२६.०४.२०१७ रोजी जाहीरात प्रसिध्द केली आहे. याबाबत आयोगाने दि.२४.०६.२०१७ रोजी लेखी परिक्षा आयोजित केली आहे.

पशुधन विकास अधिकारी गट-ब संवर्गाची पदे पदोन्नतीने भरण्याची बाब शासनाचे विचाराधीन आहे.

पशुसंवर्धन विभागातील राज्यस्तरीय गट-ड संवर्गातील २६९ रिक्त पदे भरण्याकरीता गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती आदेश देण्याबाबतची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन यांचे स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना कृषीविषयक माहिती मिळाण्यासाठी
कृषी महोत्सवाचे आयोजन करण्याबाबत

(२५) ७५७३५ (१४-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषीविषयक माहिती मिळावी यासाठी राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये कृषी महोत्सवाचे आयोजनाचा निर्णय शासनाने दिनांक ३ जानेवारी, २०१७ व त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती जिल्हयात कृषी महोत्सव घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(३) तसेच, शासनाने कृषी महोत्सवाचे आयोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (२१-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे. जिल्हा कृषि महोत्सव ही नवीन योजना राबविण्यासाठी शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र.संकीर्ण २०१६/ प्र.क्र. ४१ /३ अे, दि. ५.१.२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) प्रस्तुत योजनेच्या मान्यतेच्या शासन निर्णयानुसार माहे ऑक्टोंबर ते मार्च या कालावधीमध्ये राज्यातील ३४ जिल्हयामध्ये पाच दिवसाच्या कृषि महोत्सवाचे आयोजन करण्याचे निश्चीत करण्यात आले आहे. जिल्हा कृषि महोत्सव आयोजनासाठी रु. ६.८० कोटी एवढ्या निधीची तरतुद करण्यात आली असून सदर निधी अर्थसंकल्पीत करण्यासाठी आगामी माहे जुलै, २०१७ मधील पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात येणार

आहे. माहे ऑक्टोंबर, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधी मध्ये राज्यातील ३४ जिल्हयामध्ये कृषि महोत्सवाचे आयोजनासाठी त्याद्वारे उपलब्ध निधी वितरीत करण्यात येणार आहे. त्यामुळे अद्याप राज्यात कृषि महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले नाही. सदर योजनेंअतर्गत शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषि योजना/उपक्रमांची माहिती, संशोधित कृषि तंत्रज्ञान, नाविन्यपुर्ण प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव, बाजारपेठ व्यवस्थापन, कृषि पुरक व्यवसाय इत्यादीबाबतचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्यात येईल. कृषि प्रदर्शन, कृषि विषयक परिसंवाद आणि अनुभवी शेतकरी/उद्योजकांची व्याख्याने, यशस्वी शेतकरी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व विचारवंत यांची थेट भेट घडण्यासाठी व सामान्य शेतकऱ्यांना शंका निरसन करून घेता येण्यासाठी जिल्हा कृषि महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील एसटी स्थानके आधुनिक बस तळांसह व्यापारी संकुल उभारण्याचा एसटीमहामंडळाचा निर्णय

(२६) ७५७७५ (१७-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाने राज्यातील एसटी स्थानके आधुनिक बस तळांसह व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी महामंडळाने राज्यातील एसटी स्थानके आधुनिक बस तळांसह व्यापारी संकुल उभारण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली आहे काय, असल्यास केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील काय आहे,

(३) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१७) :(१) होय.

(२) राज्य परिवहन महामंडळाकडून दिनांक ०७.०१.२०१७ रोजी पनवेल, बोरीवली-नॅन्सी कॉलनी, पुणे-शिवाजीनगर, सोलापूर-पुणे नाका, नाशिक महामार्ग, औरंगाबाद-मध्यवर्ती, नांदेड-मध्यवर्ती, अकोला व नागपूर-मोरभवन या ९ ठिकाणच्या प्रकल्पांसाठी ई-निविदा मागविलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाटण (जि.सातारा) तालुक्यातील कोयना प्रकल्प स्तर १ व २ मुळे बाधित पुनर्वसित गावठाणांना नागरी सुविधा पुरविणेकरिता निधी उपलब्ध करून देणेबाबत

(२७) ७५८०५ (१९-०४-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील कोयना प्रकल्पामुळे अनेक गावे बाधित झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना प्रकल्पातील स्तर १ व २ मुळे बाधित झालेल्या पुनर्वसित झालेल्या गावठाणांना सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पांतर्गत 'पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे' या योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागामार्फत निधी देण्यात येत आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागामार्फत या योजनेअंतर्गत कोयना प्रकल्पातील स्तर १ व २ मुळे बाधित झालेल्या पुनर्वसित गावठाणांतील नागरी सुविधांची कामे करणेकरीता सन २०१५-१६ व २०१६-१७ या वित्तीय वर्षात निधी उपलब्ध करून दिला नसल्याने कामे खोळंबली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निधीसंदर्भात राज्याचे तत्कालीन मदत व पुनर्वसन मंत्री यांचेकडे दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी लेखी पत्राद्वारे निधीची मागणी केली असता त्यांनी सचिव मदत व पुनर्वसन यांना तात्काळ निधी उपलब्ध करून देणेबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांच्या कामांकरिता निधी उपलब्ध करून देणेसंदर्भात राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१०-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे. कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा १ व २ मुळे सातारा जिल्हयातील ९८ गावे बाधित झाली आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे. कोयना प्रकल्प स्तर १ व २ मुळे बाधित झालेल्या सातारा जिल्हयातील जावळी, महाबळेश्वर, फलटण व कोरेगाव तालुक्यातील नागरी सुविधा कामांकरिता सन २०१५-२०१६ व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षामध्ये अनुक्रमे रु. ७.७१ कोटी व १.७६ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. तथापि, पाटण तालुक्यातील कामांच्या अनुषंगाने शासन स्तरावर परिपुर्ण निधी मागणी प्रस्ताव प्राप्त न झाल्याने सदर कामांना नमूद कालावधीत निधी उपलब्ध करुन देणे शक्य झालेले नाही.

(४) व (५) होय, हे खरे आहे. सदर पत्रातील निर्देशानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांना शासन पत्र दि. १५/०६/२०१६ अन्वये त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून दि. २३/०३/२०१७ व दि. ३०/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यापैकी काही कामांना निधी वितरीत करण्यात आला असून, सुधारित प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्धतेबाबतचा प्रस्ताव कार्यवाही अंतर्गत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांविरुध्द प्रवाशांनी महामंडळाकडे गैरवर्तुणीच्या तक्रारी नोंदविल्याबाबत

(२८) ७५८२२ (१७-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी. महामंडळाच्या कर्मचा-यांविरुध्द प्रवाशांनी महामंडळाकडे गैरवर्तणुकीच्या सन २०१४-१५, २०१५-१६ या कालावधीत अनुक्रमे १०२७ व १०१२ तक्रारी नोंदविल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्टॅंड, डेपो, स्वच्छतागृहे, सुविधांची कमतरता, चुकीची तिकिटे देणे यासोबतच प्रवाशांच्या सगळ्यात जास्त तक्रारी प्रवाशांसोबत गैरवर्तनाच्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध कारणाने तोटयात चालणारे एस.टी. महामंडळातील अशा प्रकारामुळे महामंडळ आणखीनच तोट्यात जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे, त्यानुषंगाने सदर बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१७) :(१) होय.

(२) नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांविरुध्द प्रवाशांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने राज्य परिवहन शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार खातेनिहाय कारवाई केली जाते. त्याशिवाय प्रवाशांना सौजन्यपूर्वक वागणूक देणेबाबत सर्व विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील बसस्थानकावर प्रवाशांकरीता आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधांचा सुयोग्य पुरवठा करण्यात येतो. तसेच, बसस्थानकांची व वाहनतळाची दैनंदिन स्वच्छता संबंधित आगाराच्या देखरेखेखाली करुन घेतली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे धानेप, गावठाण क्र.२ (विस्तारीत) (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील गुंजवणी चापेट प्रकल्पातील पात्र प्रकल्पग्रस्तांना पर्यायी भूखंड ताबा व नागरी सुविधांची व्यवस्था करणेबाबत

(२९) ७५९३२ (१३-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धानेप, गावठाण क्र.२ (विस्तारीत) (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील गुंजवणी चापेट प्रकल्पातील पात्र प्रकल्पग्रस्तांना पर्यायी भूखंड ताबा व नागरी सुविधांची व्यवस्था करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, गुंजवणी चापेट प्रकल्प विभाग यांना दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास एक लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकल्पग्रस्तांना पर्यायी भूखंड ताबा व तेथे नागरी सुविधांची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१७) :(१) होय.

(२) धानेप क्र. २ येथील पुनर्वसन वसाहती मधील २६१ भूखंडापैकी २०१ भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत. तथापी उंच सखल पृष्ठभागामुळे भूखंड न स्विकारलेल्या प्रकल्पग्रस्तांसाठी विस्तारीत पुनर्वसन वसाहती मध्ये अतिरिक्त वाढीव भूखंड १०६ वाटप करण्यात आले आहेत.

१३२ प्रकल्पग्रस्त यांना भूखंड वाटप झालेले आहेत. कब्जा हक्काची रक्कम भरलेल्या १५ प्रकल्पग्रस्तांना ताबा देण्यात आला असून ४८ प्रकल्पग्रस्तांना ताबा देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

६३ प्रकल्पग्रस्तांनी कब्जा हक्काची रक्कम अद्यापर्यंत भरलेली नाही.

धानेप क्र. २ या पुनर्वसन वसाहतीमध्ये विद्युत पुरवठा, अंतर्गत रस्ते, बांधीव उघडी गटारे या देय नागरी सुविधा देण्यासाठीची कार्यवाही प्रगती पथावर आहे. प्रकल्पग्रस्तानी उर्वरीत शाळा, समाजमंदीर, ग्रामपंचायत इमारत, गुरांसाठी पाण्याचा हौद, स्मशानभूमी, तसेच बस थांबा इत्यादी नागरी सुविधा धानेप क्र. २ येथील गावठाणामधीलच वापरावयाच्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील सन २०१६ च्या रब्बी हंगामातील ५४५ गावांत दुष्काळ जाहीर करुन मदत देणेबाबत

(३०) ७६७२६ (२६-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील सन २०१६ च्या रब्बी हंगामात ५४५ गावे दुष्काळी म्हणून शासनाने घोषित केले मात्र अंतिम निर्णय घेवून दुष्काळाची मदत देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदरहू गावांना दुष्काळी असल्याचे अंतरिम रित्या ठरवून दुष्काळाची मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पट्टणकोडेली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील पशुवैद्यकिय दवाखान्यात पूर्णवेळ डॉक्टर उपलब्ध नसल्याबाबत

(३१) ७८१०५ (१३-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पट्टणकोडेली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील पशुवैद्यकिय दवाखान्यात पूर्णवेळ डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे दवाखाना सुरू ठेवण्यास अडचणी येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तदनुसार हा पशुवैद्यकिय दवाखाना सुरू ठेवण्याकरिता पूर्णवेळ डॉक्टर उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (१०-०७-२०१७) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना श्रे-१, पट्टणकोडोली ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर या रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन विकास अधिकारी, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांच्याकडे सोपविण्यात आला असुन त्यांचे मार्फत पशुपालक धारकांना नियमित सेवा पुरविण्यात येत आहे.
(४) पशुसंवर्धन विभागातील गट-अ संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. पशुधन विकास अधिकारी (गट-अ) या संवर्गात सद्यस्थितीत रिक्त असलेल्या १९१ पदांपैकी १०० रिक्त पदे भरण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली असून त्यानुसार या संवर्गाची १०० पदे सरळसेवेने भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.२६.०४.२०१७ रोजी जाहीरात प्रसिध्द केली असून याबाबत आयोगाने दि.२४.०६.२०१७ रोजी लेखी परिक्षा आयोजित केली आहे.

त्याच प्रमाणे पशुधन विकास अधिकारी (गट-ब) या संवर्गात रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरणेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

रंकाळा मत्स्यबीज संवर्धन केंद्र (जि.कोल्हापूर) वर्ग-१ व २ चे अधिकारी व कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(३२) ७८१०७ (१३-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रंकाळा मत्स्यबीज संवर्धन केंद्र (जि.कोल्हापूर) या केंद्राला सन २००८ पासून वर्ग-१ व २ चे अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहे,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०७-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात जेएनपीटीचा चौथा (सिंगापूर) बंधाऱ्याच्या उभारणीची आर्थिक नुकसानभरपाई स्थानिक मच्छीमारांना मिळण्याबाबत

(३३) ७८१३४ (१३-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात जेएनपीटीचा चौथा (सिंगापूर) बंधारा बांधण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्याच्या उभारणीसाठी टाकण्यात येणाऱ्या प्रचंड भरावामुळे पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छिमारांचा रोजगार बुडणार असल्यामुळे या मच्छीमारांना आर्थिक नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी स्थानिक मच्छिमारांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणा-या स्थानिक मच्छिमारांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०७-२०१७) :(१) होय.
(२) होय.
(३) दिनांक २७ मार्च, २०१० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत निश्चित करण्यात आलेल्या नुकसान भरपाई रक्कमेच्या विरोधात संबंधीत कंपन्यांनी न्यायालयात अपील दाखल केले असल्यामुळे सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत शेतक-यांसाठी सुरु करण्यात आलेल्या ठिंबक सिंचन योजनेबाबत

(३४) ७८४५२ (१४-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत शेतक-यांसाठी सुरु करण्यात आलेल्या ठिंबक सिंचन योजनेचे उद्दीष्ट संपल्याने शेवटचे दोन दिवस संगणक यंत्रणा बंद करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे कोल्हापूर जिल्हयातील एक हजाराहून अधिक शेतकरी या योजनेपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अनेक वेळा संकेतस्थळाला तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने शेतक-यांना ऑनलाईन फॉर्म भरता आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत या योजनेस मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (२६-०७-२०१७) :(१) नाही.

(२) नाही. सुक्ष्म सिंचनासाठी शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात येतात व उपलब्ध निधीच्या मर्यादेत प्राथम्यक्रमानुसार प्राप्त अर्जांना पूर्वसंमती देण्यात येते.

सन २०१६-१७ या वर्षात कोल्हापूर जिल्हयासाठी रु.६९३.५५ लक्ष एवढ्या रक्कमेचे लक्षांक होते. शेतकऱ्यांकडून प्राप्त अर्जांपैकी ४६५८ एवढे पात्र अर्ज होते. उपलब्ध निधीच्या मर्यादेत त्यापैकी ३०२१ अर्जदारांना पूर्वसंमती देण्यात आली आहे.

(३) नाही.

(४) उपलब्ध निधीमधून राबवावयाच्या कार्यक्रमासाठी पुरेसे अर्ज प्राप्त झाल्याने मुदतवाढ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयातील देवधर मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांबाबत

(३५) ७८७१३ (१३-०४-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवधर मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या कुर्ली गावातील नागरिकांना फोंडाघाट-लोरे (जि.सिंधुदुर्ग) येथील माळावर भूखंड देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूखंडावर अदयापी प्रकल्पग्रस्तांनी घरे बांधली नसल्यामुळे सदर भूखंड शासनास परत करण्याबाबत लाभार्थ्यांना भूसंपादन अधिका-यांनी नोटिसा दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासनाच्या नोटिसांना प्रकल्पग्रस्तांनी तीव्र विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(५) तदनुसार उपरोक्त जमीन परत न घेण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

ज्या प्रकल्पग्रस्तांना भूखंड मंजूर करुन ताबा देण्यात आलेला असूनही अद्याप त्यांनी घराचे बांधकाम केले नाही, अशा प्रकल्पग्रस्तांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी नोटीसा दिल्या आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) ११० प्रकल्पग्रस्तांना नोटीसा काढण्यात आलेल्या होत्या त्यापैकी ५४ प्रकल्पग्रस्तांनी भूखंडाबाबत आवश्यक ती कागदपत्रे, लेखी जबाब दिलेला आहे.
(५) ज्यांना पुनर्वसन गावठाणात नियमानुसार भूखंड देण्यात आलेला आहे, त्यानी घर न बांधता अन्यत्र घर बांधलेले असेल तरी देण्यात आलेला भूखंड परत घेण्यात येवू नये, असा शासन निर्णय झालेला असल्याने संबंधित प्रकल्पग्रस्तांकडून भूखंड काढून घेणेची कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात प्रवासी क्षमता वाढविण्याकरिता एस.टी महामंडळाकडून डबलडेकर बस सेवा सुरु करण्याबाबत

(३६) ७९४१६ (१७-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रवासी क्षमता वाढवितानाच एसटीचा चलनीय खर्च कमी व्हावा याकरिता एस.टी महामंडळाकडून डबलडेकर बस प्रवाशांच्या ताफ्यात आणण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांत्रिक अडथळयाचा प्रश्न पुढे करुन याकडे एसटी महामंडळ दुर्लक्ष करीत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे लक्षात घेता त्वरीत कार्यवाही करण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१७) :(१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे वातानुकूलित दुमजली (डबल डेकर) बसेस चालविण्यासंदर्भात मुंबई-पुणे या मार्गाची तपासणी करण्यात आली. परंतू उपलब्ध मार्गावर दुमजली (डबल डेकर) बस चालविण्यासंदर्भात तांत्रिक व चालनिय अडचणी असल्याने सद्य:स्थितीत वातानुकूलित डबलडेकर बससेवा मुंबई-पुणे मार्गावर चालविणे राज्य परिवहन महामंडळाच्या व प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टाने हितावह नाही. सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाद्वारे शिवनेरी, शितल, हिरकणी इ. प्रकारच्या बसेसद्वारे राज्यातील प्रवाशांना पुरेशी सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदा तांडा (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील राम लाला चव्हाण या शेतकऱ्याने सेवा संस्था व खाजगी कर्जाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

(३७) ७९६२९ (१४-०३-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदा तांडा (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील राम लाला चव्हाण या शेतकऱ्याने सेवा संस्था व खाजगी कर्जाला कंटाळून विष घेऊन आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्याच्या कुटूंबाला दोन लाख रुपयांची मदत करुन त्याच्या पत्नीस निराधार योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१७) :(१) होय, अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरणात तालुकास्तरीय समितीने चौकशी केली असता शेतकऱ्याने नापिक व कर्जाला कंटाळून आत्महत्या केल्याचे आढळून आले आहे.

(३) सदर प्रकरणात मयत शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या वारसास शासन निर्णयानुसार रू.१,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख) आर्थिक मदत देण्यात आली असून मयताच्या पत्नीस निराधार योजनेचा लाभ देणेबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यात थंडीमुळे चिकू बागांचे झालेले नुकसान

(३८) ८०५२७ (१९-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात माहे जानेवारी, २०१७ पासून पडलेल्या कडाक्याच्या थंडीमुळे चिकू बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनामार्फत याची पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले
(३) असल्यास, पाहणीअंती नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

एसटी महामंडळाच्या कार्यशाळेत नवीन बसेस तयार करून त्या वापरात आणण्याबाबत

(३९) ८१३५६ (१७-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एसटी महामंडळाच्या कार्यशाळेत दरवर्षी नवीन बसेस तयार करून त्या वापरात आणल्या जातात मात्र यावर्षी या एसटी बाहेरून तयार करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यासाठी चार महिन्यांपूर्वी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निविदा प्रक्रियेमुळे १५०० नवीन बसेस अद्यापही एसटीत दाखल झालेल्या नसल्यामुळे जुन्या बसमधून एसटीचा प्रवास सुरु आहे, हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, तातडीने ही निविदा प्रक्रिया पूर्ण करून नवीन एसटी बसेस दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१७) :(१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यशाळांमध्ये साधी, निमआराम इ. बसेसची बांधणी तसेच जुन्या बसेसचे पुन:स्थितीकरण करण्यात येते. परंतू, महामंडळाच्या कार्यशाळेत वातानुकूलित बसेस तयार होत नसल्याने वातानुकूलित ५०० बसेसची बांधणी बाहेरुन तयार करुन घेण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून खरेदी आदेश देण्यात आले आहेत.

राज्य परिवहन महामंडळाकडे पुरेसा चालनिय वाहन ताफा उपलब्ध असल्याने प्रवाशांची गैरसोय होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे काम रखडल्याबाबत

(४०) ८१४१६ (१३-०४-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राची इमारत मोडकळीस आल्याने येथील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र बंद करून खासगी भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेत सुसज्ज मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राची इमारत उभारण्यास राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत माहे सप्टेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी देण्यात आली असून यासाठी ३ कोटी ७३ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला व यातील १ कोटी रूपयांचा निधी सन २०१५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तांत्रिक अडचणींची कारणे देत सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्यापपर्यंत प्रशिक्षण केंद्र उभारणीच्या कामाला सुरूवात केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार सदर मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या इमारत उभारणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२०-०७-२०१७) :(१) होय.

(२) होय.

(३) होय

(४) व (५) या प्रकरणी आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्यांसमवेत दिनांक २९.१२.२०१६ रोजी बैठक घेऊन ठेकेदाराकडून सुरक्षा अनामत रक्कम घेऊन वर्क ऑर्डर देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करुन, बांधकामास सुरुवात करण्याचे आदेश दिले होते. तथापि, ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम भरली नसल्याने त्याची निविदा रद्द करुन पुनश्च: निविदा मागविणेबाबतची कार्यवाही कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करणेबाबत

(४१) ८२३७२ (१३-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण प्रदेशात मोठ्या प्रमाणात मत्स्य उत्पादन व मत्स्य व्यवसाय होत असल्याने हजारो तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यवसायाला आधुनिक स्वरूप देण्यासाठी कोकणासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस महाराष्ट्र कृषी शिक्षण परिषद पुणे यांनी शासनास करावी असे निर्देश दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शिक्षण संचालकानी दिली आहे काय,

(३) असल्यास, शिफारशीच्या अनुषंगाने यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०७-२०१७) :(१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरगा व लोहारा (जि.उस्मानाबाद) या दोन्ही तालुक्यातील सर्व मंडळांमध्ये यंदा १००० मि.ली. पेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत

(४२) ८२५६० (१३-०४-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा व लोहारा या दोन्ही तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) सर्व मंडळांमध्ये यावर्षी १००० मि.ली.पेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे शेतक-यांच्या विविध पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमरगा व लोहारा तालुक्यांमध्ये ओला दुष्काळ जाहीर करुन नुकसान झालेल्या उडीद, सोयाबीन आदी पिकांसाठी नुकसानभरपाई देण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, पाण्याच्या प्रवाहामुळे शेतातील माती वाहुन गेलेल्या अनेक शेतक-यांच्या शेतातील मातीचे स्वतंत्र पंचनामे करुन त्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी अशीही मागणी उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग १ व २ मधील मागणीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१४ डिसेंबर, २०१६ रोजी निवेदन दिले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यात माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना पिक नुकसानीवर मदत जाहीर करण्याचा निर्णय दि.९ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

डोंबविली (जि.ठाणे) राज्य परिवहन महामंडळाच्या उपस्थानकातून कोकण विभागात जाणा-या बस सेवा बंद केल्याबाबत

(४३) ८२८२२ (१७-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबविली (जि.ठाणे) राज्य परिवहन महामंडळाच्या उपस्थानकातून कोकण विभागात जाणाऱ्या बस सेवा प्रवाशांची भरपूर संख्या असतांनाही बंद करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसस्थानकात दुपारी २ ते रात्री १० पर्यंत नियंत्रक नसल्याने प्रवांशाना माहिती देण्यास कोणीही नसते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बस स्थानका शेजारी झोपडपटटी असून तेथील नागरिक तेथील मोकळया जागेचा वापर शौचालयासाठी करतात त्यामुळे दुर्गंधी पसरली असून या बसस्थानकावर पोलीस चौकी, कॅन्टीन, वर्तमानपत्राचे स्टॉल नाहीत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, सदरहू बस स्थानकातून कोकणात जाणा-या येणा-या बस सेवा पुन्हा सुरु करण्यासोबतच येथील गैरसोयी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) डोंबिवली बसस्थानकाची दैंनदिन साफसफाई सफाई कामगारांकडून केली जाते. या स्थानकात प्रवाशांचा प्रतिसाद कमी असल्याने कँन्टीन, वर्तमानपत्र स्टॉल अस्तीत्वात नाही. सदर ठिकाणी पोलीस चौकी कार्यान्वित नाही. परंतू पोलीसांचे पेट्रोलिंग नियमित सुरु आहे.

(५) विठ्ठलवाडी-चिपळूण ही बंद केलेली फेरीसह सर्व फेऱ्या सुरु आहेत. होळी व गणपती या काळात जादा फेऱ्या चालविल्या जात आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

फलटण शहराच्या (जि.सातारा) एस.टी. बस स्थानकात अनेक मोठे खड्डे पडल्याने त्याचा प्रवाशांना त्रास होत असल्याबाबत

(४४) ८२८४० (१७-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलटण शहराच्या (जि.सातारा) मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या एस.टी. बस स्थानकात अनेक मोठे खड्डे पडले असून या खड्डयात एस. टी. बसेसची मोठया प्रमाणात आदळआपट होत असून त्याचा प्रवाशांना त्रास होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन प्रवाशांना होणारा त्रास दूर करण्यासाठी या बस स्थानकाचे डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) फलटण बसस्थानकावर पडलेले खड्डे भरुन घेण्यात आले आहेत. तसेच, बसस्थानकाच्या दर्जावाढीच्या कामास शासनाच्या सर्वसाधारण योजनेअंतर्गत रु.१५०.०० लक्षची प्रशासकीय मान्यता दिलेली असून सदर कामासाठी ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमारांना डीझेल खरेदीपैकी मूल्यवर्धीत कराचा परतावा न मिळाल्याबाबत

(४५) ८३३८० (१३-०४-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमारांना डीझेल खरेदीपैकी मूल्यवर्धीत कराचा परतावा न मिळाल्याने मच्छिमार हे कर्जबाजारी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत मच्छिमारांनी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना निवेदनाद्वारे परताव्याची रक्कम मिळणेबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परताव्याची रक्कम संबधीत मच्छिमारांना देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०७-२०१७) :(१) नाही.
(२) होय.
(३) या योजने अंतर्गत रत्नागिरी जिल्हयाला खालीलप्रमाणे मुल्यवर्धित कर परतावा रक्कम देण्यात आली आहे.

१. सन २०१४-१५ मध्ये रु.११.५० कोटी
२. सन २०१५-१६ मध्ये रु.२६.९४ कोटी
३. सन २०१६-१७ मध्ये रु.१९.३५ कोटी
४. सन २०१७-१८ करीता शासन पत्र दि.५.४.२०१७ अन्वये रु. ६०.०० कोटी निधी अर्थसंकल्पीत केला असून, संगणक प्रणालीवर प्राप्त झालेला नाही. तो प्राप्त झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्हातील नेकनूर (ता.बीड) व अंबेजोगाई (ता.अंबेजोगाई) येथील बसस्थानकाच्या नुतनीकरणाबाबत व मुलभुत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

(४६) ८३५३५ (१३-०४-२०१७). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हातील नेकनूर (ता.बीड) व अंबेजोगाई (ता.अंबेजोगाई) येथील बसस्थानकाची जीर्ण इमारत व बसस्थानकांत मुलभूत सुविधांची कमतरता असल्याने गेल्या अनेक वर्षापासून प्रवाश्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुसार शासनाने बसस्थानक नूतनीकरनाबाबत व मुलभुत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१७) :(१) अशंत: खरे आहे.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या नेकनूर व अंबेजोगाई बसस्थानकाच्या नुतनीकरणासाठी नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे. सद्यस्थितीत दोन्ही बसस्थानकांवर प्रवाशांना बसण्यासाठी बाकडे, चौकशी कक्ष, उपहारगृह, प्रसाधनगृह इ. सोई-सुविधा उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कोरेगाव भीमा (वाडा पुनर्वसन) (ता.शिरूर, जि.पुणे) येथील प्रकल्पग्रस्त म्हणून वाटप झलेल्या भोगवटदार वर्ग-२ भूखंडाचे रुपांतर भोगवटदार वर्ग-१ मध्ये करण्याबाबत.

(४७) ८३९२० (१३-०४-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोरेगाव भीमा (वाडा पुनर्वसन) (ता.शिरूर, जि.पुणे) येथील प्रकल्पग्रस्त म्हणून भोगवटदार वर्ग-२ चे वाटप झालेले २६९ भूखंडापैकी ८० भूखंड शासन निर्णयानुसार भोगवटदार वर्ग-१ मधे रुपांतरीत केले असून अद्याप १८९ भूखंड भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास उर्वरित भूखंड भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने भोगवटदार वर्ग-२ चे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१७) :(१) होय.
(२) होय.
(३) पुनर्वसित गावठाणांत प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडांचे भोगवटदार वर्ग-२ मधूनचे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात ११२ पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करण्याबाबत .

(४८) ८४१९३ (१३-०४-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात १८ व्या पशुगणनेनुसार म्हैस, गाय, शेळ्या-मेंढ्या आणि कोंबड्यांची एकूण संख्या सुमारे १ कोटी ३० लाख इतकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुधन घटकानुसार जिल्ह्यामध्ये २८७ पशुवैद्यकीय दवाखान्यांची गरज असतांनाही केवळ १७५ दवाखाने सुरु असल्यामुळे जनावरांना वेळेवर उपचार मिळत नसून पशुधनाची हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये उर्वरित ११२ पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०५-०७-२०१७) :(१) हे खरे नसून, सन २००७ च्या १८ व्या पशुगणनेनुसार कोल्हापूर जिल्हयात गाय वर्ग, म्हैस वर्ग, शेळया-मेंढया, कुक्कुट इत्यादीची एकूण संख्या १८, १७, ६६७ आहे. तर, सन २०१२ च्या १९ व्या पशुगणनेनुसार एकूण पशुधन संख्या १८, २१, ८८० एवढी आहे.
(२) १९ व्या पशुगणनेनुसार कोल्हापूर जिल्हयातील डोंगरी व बिगर डोंगरी अशी एकूण ९, २३, ८५० पशुधन घटक संख्या असून त्यासाठी निकषानुसार २८१ पशुवैद्यकीय दवाखान्यांची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत कोल्हापूर जिल्हयात एकूण १७६ पशुवैद्यकीय संस्था कार्यरत असून त्यांच्यामार्फत जिल्हयातील सर्व गावांमधील पशुधनास आवश्यक त्या सर्व पशुवैद्यकीय सेवा नियमितपणे पुरविल्या जात आहेत. तसेच, कोल्हापूर जिल्ह्यात गोकूळ दूध संघाकडील ६२, वारणा दूध संघाकडील ४७ ब स्वाभिमानी दुध संघाकडील १२ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्यांचे सभासद असलेल्या पशुपालकांच्या दुधाळ पशुधनास कृत्रिम रेतन व औषधोपचार या सुविधा पुरविल्या जात असल्यामुळे पशुधनाची हानी होत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ ची स्थापना करण्यासाठी विविध संवर्गातील तीन नवीन पदे निर्माण करणे आवश्यक आहे. सन २०१३ मध्ये पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ ची स्थापना, अस्तित्वातील श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा दर्जावाढ करुन त्यांचे रुपांतर

श्रेणी-१ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यात करणे व तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाची स्थापना करणे यासाठी राज्यातील विविध जिल्हयांमधील प्रस्तावांच्या अनुषंगाने विविध संवर्गातील आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नयेत, असे अभिप्राय दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगरच्या (जि.ठाणे) आगरतून लांब पाल्याच्या मार्गावरील १०० बसेस बंद केल्याबाबत

(४९) ८४३५२ (१३-०४-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगरच्या (जि.ठाणे) ८ आगारातून लांबपल्याच्या मार्गावरील कोकण, विदर्भ, खानदेश व पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हयात व तालुक्याच्या ठिकाणी १२ माही व कायमस्वरूपी सुरु असलेल्या १०० बसेस अचानक दिनांक २९ जून, २०१६ रोजीपासून बंद केलेल्या असल्याने प्रवाशांची अडचण होत असल्याचे एका सेवाभावी संघटनेने माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास लेखी पत्रान्वये निदर्शनात आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकेकाळी उत्पन्नाचे बाबतीत महाराष्ट्रात प्रथम व द्वितीय क्रमांकावर असलेल्या विठ्ठलवाडी आगारातून १२ लांब पल्याच्या बसेस बंद केल्याने एस टी. महामंडळाचे उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विठ्ठलवाडी, आगारात चालक वाहकांच्या बरीच पदे रिक्त आहेत, स्पेअर पार्ट वेळेवर मिळत नसल्यामुळे नादुरुस्त गाड्या दुरुस्त होण्यास विलंब लागतो या सर्व कारणामुळे लांब पल्याच्या प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उपरोक्तबाबात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१७) :(१) व (२) राज्य परिवहन महामंडळाच्या सुसूत्रीकरण ध्येय धोरणानुसार माहे जून,२०१६ मध्ये विभागाकडून काही लांब व मध्यम लांब पल्ला फेऱ्या या कमी गर्दीच्या हंगामात थेट प्रवाशी कमतरतेमुळे तात्पूरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आलेल्या होत्या. तथापि, त्यातील काही महत्वाच्या फेऱ्या प्रवाशी गर्दी, हंगाम, दिवाळी जादा व इतर जादा वाहतूकीत प्रवाशांच्या मागणीनुसार सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीवर तसेच, आगारांच्या उत्पन्नात फारसा परिणाम झालेला नाही.

(३) व (४) सद्यस्थितीत विठ्ठलवाडी आगारात ११३ चालक व ११८ वाहक कार्यरत आहेत. सध्याच्या चालनीय स्थितीत १९ चालक व १४ वाहक कमी आहेत. त्या अनुषंगाने महामंडळाद्वारे चालक/वाहक भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

विठ्ठलवाडी आगारास दरकरारधारक पुरवठाधारकांकडून आवश्यकतेनुसार सुटया भागांची खरेदी करुन पुरवठा करण्यात येतो. तसेच, आवश्यकता भासल्यास ठाणे विभागाकडून स्थानिक बाजारातून सुटया भागांची खरेदी करुन आगारास पुरविण्यात येतात. आगारास मंजूर असलेल्या नियतांच्या प्रमाणात पुरेशा गाडया उपलब्ध आहेत. सद्यस्थितीत या आगाराला ४६ नियतांसाठी ५७ वाहने उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत मिळणा-या कांदाचाळ अनुदानाचा लाभ मिळण्याबाबत

(५०) ८४५०१ (१४-०४-२०१७). श्री.आऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यात राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत मिळणा-या कांदा चाळ अनुदानाचा लाभ घेण्यासाठी सुमारे १२८ शेतक-यांनी आवश्यक कागदपत्रासंह अर्ज केले असतांनाही येथे निधी असूनही केवळ ७ शेतक-यांना अनुदान मिळाले असून उर्वरित शेतकऱ्यांमध्ये निराशा पसरली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कृषी विभागाने जिल्हयातील कांदाचाळीच्या अनुदानाचे नव्याने अर्ज स्विकारणे गत सात महिन्यांपासून बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने मागील वर्षी व यावर्षी कांदाचाळीच्या अनुदानासाठी अर्ज केलेल्या शेतक-यांना सदर अनुदानाचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (२६-०७-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

श्रीरामपूर तालुक्यातील १२८ अर्जदारांमधून लॉटरी पद्धतीने एकूण ८७ लाभार्थ्यांना कांदाचाळ उभारण्यासाठी पूर्वसंमती देण्यात आली आहे. त्यापैकी ३७ लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्यात आले असून उर्वरीत ५० लाभार्थ्यांकडून अनुदान मागणी प्रस्ताव प्राप्त होताच, अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.